# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## Savitribai Phule Pune University, Pune

**पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (PG)**

**[Two Years PG Program]**

**(As per SPPU Circular 122/2023, Date- 21/06/2023)**

**Level 6.0**

**अभ्यासक्रम : पदव्युत्तर पदवी - मराठी (प्रथम वर्ष)**

(शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून)

**CURRICULUM AND SYLLABUS**

**OF**

**P.G. YEAR - I, MAJOR - MARATHI**

w.e.f. Academic Year 2023-24

(Revised on 25 Aug. 2023)

## M. A. मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम (शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून)

१ .**Title of the course: M. A. (मराठी)**

२ .**Preamble of the syllabus:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एम. ए. मराठीचा अभ्यासक्रम तयार करत असताना काही आधारभूत तत्त्वे स्वीकारली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणताना विद्यार्थीकेंद्री, अंतरविद्याशाखीय, रोजगाराभिमुख, कौशल्याधिष्ठित असे भाषा व साहित्याचे अभ्यासक्रम अनुसरणे आवश्यक आहे. तसेच कौशल्यविकासासाठी भाषा, साहित्य व कला ही माध्यमे अधिक परिणामकारकतेने समजून घेणे आवश्यक झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिकक्षमता, भाषिकक्षमता विकसित करणे व जीवनाच्या आकलनासाठी त्यांना सिद्ध करणे ही काळाची गरज बनली आहे .तसेच विद्यार्थ्यांना मराठी भाषा आणि साहित्याचे सखोल ज्ञान व्हावे, त्यांच्यामध्ये संशोधनाची तसेच अंतरविद्याशाखीय अभ्यास करण्याची वृत्ती वाढावी असे विविध हेतू समोर ठेवून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एम. ए. मराठीचा अभ्यासक्रम तयार केला आहे .

**एम. ए. मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना पुढील क्रमाने करण्यात आली आहे.**

१. **First Year M.A. 2023-24 (Level 6.0)**

२. **Second Year M.A. 2024-25 (Level 6.5)**

एम. ए. मराठी हा पुनर्रचित अभ्यासक्रम दोन वर्षांचा आणि चार सत्रांमध्ये विभागलेला आहे. त्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून पुनर्रचना करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रथम वर्षात मध्ययुगीन मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक भाषाविज्ञान, प्रशासकीय लेखनकौशल्य, अमराठी भाषकांसाठी मराठीचे अध्यापन, विविध साहित्य प्रवाहांचा अभ्यास, अभिजात भाषा आणि मराठी भाषा, चित्रपट माध्यम आणि साहित्याचे माध्यमांतर, मराठीचे व्याकरण, वाङ्मयइतिहास लेखनविद्या, संशोधन पद्धती, समाजभाषा विज्ञान, व्यावसायिक लेखनकौशल्य या स्वरूपाची अभ्यासक्रमाची पुनर्रचना असून; सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढील तक्त्यात दिल्याप्रमाणे प्रथम वर्षात ४४ आणि द्वितीय वर्षात ४४ अशा एकूण ८८ श्रेयांकाचा हा अभ्यासक्रम पूर्ण केला जाणार आहे .या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मुख्य विषयाबरोबरच विषय निवडीची संधी दिली जाणार आहे शिवाय सैद्धांतिक व प्रात्यक्षिके यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

### Savitribai Phule Pune University, Pune

#### Credit Framework for Post Graduate (PG)

| Level | Semester | Credits Related to Major | | Research Methodology (RM) | Internship On Job Training (OJT) | Research Project (RP) | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Major Core | Major Elective | | | | |
| 6.0 | I | 10(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 4 | 0 | 0 | **22** |
| | II | 10(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 4 (OJT) | 0 | **22** |
| **Exit option:** Award PG Diploma on completion of 44 Credits after Three Year UG Degree **OR** continue with PG second year | | | | | | | |
| 6.5 | III | 10 (T) + 4 (P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 0 | 4 | **22** |
| | IV | 8 (T) + 4 (P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 0 | 6 | **22** |
| Total 4 Years | | 54 | 16 | 4 | 4 | 10 | **88** |
| 2 Years-4 Sem. Award PG Degree on completion 88 credits after Three Year UG Degree or 1 Year-2 Sem PG Degree (44 credits) after Four Year UG Degree | | | | | | | |

**Notes:**

**Abbreviation:** T – Theory, P – Practical

3. Wherever require the BOS can choose theory or practical course as per the need and within the given structure.
4. Each course should be designed with minimum 2 or maximum 4 credits.

**M.A. MARATHI**
**(w.e.f. academic year 2023-24)**

## अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :

**PROGRAMME EDUCATIONAL OBJECTIVES (PEOs)**

**विद्यार्थ्यांना पदव्युत्तर स्तरावर मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.**

| | |
|---|---|
| PEO-1 | पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन आणि जीवनविषयक जाणिवा समृद्ध करणे. |
| PEO- 2 | विशिष्ट कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती लक्षात घेऊन साहित्याचे आकलन करून घेणे. |
| PEO- 3 | वाङ्मयीन परंपरेची जाणीव करून देणे. |
| PEO- 4 | विविध भाषाभ्यासाच्या पद्धतींची ओळख करून देणे. |
| PEO- 5 | मूलभूत साहित्यसिद्धांतांचा परिचय करून देणे. |
| PEO- 6 | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्ये विकासाची जाणीव-जागृती घडवून आणणे. |
| PEO- 7 | साहित्यकृतींच्या चिकित्सक अभ्यासाची प्रवृत्ती वृद्धिंगत करणे. |
| PEO- 8 | विविध समीक्षापद्धतींची ओळख करून देणे. |
| PEO- 9 | विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराच्या क्षमता विकसित करणे. |
| PEO- 10 | अभ्यासकाचे व्यक्तिमत्व सुसंस्कारित करणे. |

## अभ्यासक्रमाची अध्ययन निष्पत्ती :

**PROGRAMME OUTCOMES(POs) AND PROGRAMME SPECIFIC OUTCOMES(PSOs) :**

**हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमतांचा विकास होईल.**

| | |
|---|---|
| PO- 1 | पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन आणि जीवनविषयक जाणिवा समृद्ध होतील. |
| PO- 2 | साहित्यकृतीच्या चिकित्सक अभ्यासाची प्रवृत्ती वृद्धिंगत होईल. |
| PO- 3 | भाषिक जाणिवा विकसित करून कौशल्यात्मक उपयोजनासाठी सिद्ध होतील. |
| PO- 4 | विविध जीवनक्षेत्रातील भाषाविषयक कौशल्य ग्रहणानंतर रोजगारक्षमतांची आणि प्रावीण्यांची निर्मिती होईल. |
| PO- 5 | विशिष्ट कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती लक्षात घेऊन साहित्याचे नेमके आकलन करून घेता येईल. |
| PO- 6 | तौलनिक अभ्यास, भाषांतर मीमांसा, प्रभाव अभ्यास, आंतर्विद्याशाखीय दृष्टी, परभाषेतील समकालीन साहित्यकृती, वाङ्मयेतिहास, संस्कृती अभ्यास, भाषिक अभ्यास याद्वारे साहित्याच्या अभ्यासाला परिपूर्णता आणता येईल. |
| PO- 7 | पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यविचार, साहित्यसिद्धांत, समीक्षा, साहित्यविमर्श, विविध वाङ्मयीन संप्रदाय, वेळोवेळी उद्भवणाऱ्या जीवनविषयक व वाङ्मयीन चर्चा, संकल्पना यांचा पैस विद्यार्थ्यांना परिचित होईल |
| PO- 8 | संशोधनाची निरनिराळी अंगे तसेच संशोधनाच्या विविध पध्दतींची ओळख होईल. |
| PSO- 1 | वाङ्मयीन मूल्यांचे आणि जीवनमूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यास मदत होईल. |
| PSO- 2 | वाचन, आस्वादन, विश्लेषण, वर्गीकरण, मूल्यनिर्णयन या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांची वाङ्मय आकलनाची क्षमता वृद्धिंगत होईल. |
| PSO- 3 | साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पराश्रयी संबंध जागतिक परिप्रेक्ष्यात लक्षात घेण्याची क्षमता व कौशल्ये निर्माण होतील. |
| PSO- 4 | मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या अनुबंधाचा शोध घेता येईल. |

## COURSE STRUCTURE

P.G. Year-I, Major-Marathi, Sem-I (w.e.f. academic year 2023-24) (Revised on 25 Aug. 2023)

| Year/ Level/ Sem. | Type | Course Code | Course Title | Credits/ Course | Credits (T+P)* | Hours (T+P)* |
|---|---|---|---|---|---|---|
| Yr- 1st<br>L- 6.0<br>Sem- I | **Major Core Courses (Compulsory)** | MAR 501 MJ | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १८१८ ते इ.स. १९२०) | **4 (T)** | **4 (T)** | **60** |
| | | MAR 502 MJ | ऐतिहासिक भाषाविज्ञान | **4 (T)** | **4 (T)** | **60** |
| | | MAR 503 MJ | प्रशासनिक लेखनकौशल्ये | **2 (T)** | **4**<br>**2(T)+2(P)** | **90**<br>**30(T)+60(P)** |
| | | MAR 503 MJP | प्रशासनिक लेखनकौशल्ये : प्रात्यक्षिक | **2 (P)** | | |
| | | MAR 504 MJP | प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया | **2 (P)** | **2 (P)** | **60** |
| | **Major Elective Courses** (Choose **Any One** with Same no. MJ+MJP group) | MAR 510 MJ | साहित्यप्रवाहांचा अभ्यास : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य | **2(T)** | **4**<br>**2(T)+2(P)** | **90**<br>**30(T)+60(P)** |
| | | MAR 510 MJP | साहित्यप्रवाहांचा अभ्यास : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य – प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | | MAR 511 MJ | तौलनिक साहित्याभ्यास - भाग १ | **2(T)** | | |
| | | MAR 511 MJP | तौलनिक साहित्याभ्यास - भाग १ : प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | | MAR 512 MJ | साहित्यप्रकारांचे रूपांतर - भाग १ | **2(T)** | | |
| | | MAR 512 MJP | साहित्यप्रकारांचे रूपांतर - भाग १ : प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | | MAR 513 MJ | मराठी व्याकरण - भाग १ | **2(T)** | | |
| | | MAR 513 MJP | मराठी व्याकरण - भाग १ : प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | | MAR 514 MJ | वाङ्मयेतिहास लेखनविद्या - भाग १ | **2(T)** | | |
| | | MAR 514 MJP | वाङ्मयेतिहास लेखनविद्या - भाग १ : प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | **RM** | MAR 541 MN | संशोधन पद्धती | **2(T)** | **4**<br>**2(T)+2(P)** | **90**<br>**30(T)+60(P)** |
| | | MAR 541 MNP | संशोधन पद्धती : प्रात्यक्षिक | **2(P)** | | |
| | | | **एकूण श्रेयांक** | **22** | **22** | **450** |

## COURSE STRUCTURE

P.G. Year-I, Major-Marathi, Sem-II (w.e.f. academic year 2023-24) (Revised on 25 Aug. 2023)

| Year/ Level/ Sem. | Type | Course Code | Course Title | Credits/ Course | Credits (T+P)* | Hours (T+P)* |
|---|---|---|---|---|---|---|
| Yr- 1st<br>L- 6.0<br>Sem- II | Major Core Courses (Compulsory) | MAR 551 MJ | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १९२० ते इ.स. २०१०) | 4 (T) | 4 (T) | 60 |
| | | MAR 552 MJ | समाजभाषाविज्ञान | 4 (T) | 4 (T) | 60 |
| | | MAR 553 MJ | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये | 2 (T) | 4<br>2(T)+2(P) | 90<br>30(T)+60(P) |
| | | MAR 553 MJP | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये: प्रात्यक्षिक | 2 (P) | | |
| | | MAR 554 MJP | नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन | 2 (P) | 2 (P) | 60 |
| | Major Elective Courses (Choose Any One with Same no. MJ+MJP group) | MAR 560 MJ | साहित्यप्रवाहांचा अभ्यास : आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य | 2(T) | 4<br>2(T)+2(P) | 90<br>30(T)+60(P) |
| | | MAR 560 MJP | साहित्यप्रवाहांचा अभ्यास : आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य – प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | | MAR 561 MJ | तौलनिक साहित्याभ्यास - भाग २ | 2(T) | | |
| | | MAR 561 MJP | तौलनिक साहित्याभ्यास - भाग २ : प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | | MAR 562 MJ | साहित्यप्रकारांचे रूपांतर - भाग २ | 2(T) | | |
| | | MAR 562 MJP | साहित्यप्रकारांचे रूपांतर - भाग २ : प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | | MAR 563 MJ | मराठी व्याकरण - भाग २ | 2(T) | | |
| | | MAR 563 MJP | मराठी व्याकरण - भाग २ : प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | | MAR 564 MJ | वाङ्मयेतिहास लेखनविद्या - भाग २ | 2(T) | | |
| | | MAR 564 MJP | वाङ्मयेतिहास लेखनविद्या - भाग २ : प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | OJT | MAR 581 OJT | व्यावसायिक प्रशिक्षण | 2(T) | 4<br>2(T)+2(P) | 90<br>30(T)+60(P) |
| | | MAR 581 OJT | व्यावसायिक प्रशिक्षण : प्रात्यक्षिक | 2(P) | | |
| | | | **एकूण श्रेयांक** | 22 | 22 | 450 |

*(T- Theory, P- Practical)

**मूल्यमापन* :**

| **मूल्यमापनाचे स्वरूप** | | |
|---|---|---|
| **अ) विद्यापीठ परीक्षा - ५०%** | | |
| **ब) अंतर्गत मूल्यमापन : लेखी परीक्षा आणि प्रात्यक्षिक परीक्षा - ५०%** | | |
| १. | खुले पुस्तक परीक्षा | |
| २. | सादरीकरण | |
| ३. | गटचर्चा | |
| ४. | प्रकल्पलेखन | |
| ५. | ग्रंथालयीन कार्य | |
| ६. | विस्तार कार्य | |
| ७. | मौखिक परीक्षा | |
| ८. | शोधनिबंध लेखन | |
| वरीलपैकी किमान **दोन** पर्याय (१ लेखी + १ प्रात्यक्षिक) अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी निवडावे. | | |
| | **एकूण** | |

(*मूल्यमापन प्रक्रियेसंदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठाकडून अथावकाश कळविण्यात येईल.)

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 501 MJ** | **अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १८१८ ते इ.स. १९२०)** | **Credits- 4**<br>**4 (T)** | **Hours- 60**<br>**60 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

सदर अभ्यासपत्रिकेतून इ. स. १८१८ ते इ.स. १९२० या कालखंडातील मराठी साहित्याचे स्वरूप जाणून घेता येईल. तसेच या कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती समजून घेण्यास मदत होईल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) वाङ्मयेतीहासाची संकल्पना समजून घेणे .

२) अर्वाचीन कालखंडाची सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन पार्श्वभूमी समजून घेणे.

३) इ.स. १८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप अभ्यासणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **वाङ्मयेतिहास : स्वरूपमीमांसा**<br>१.१ वाङ्मयेतिहासाची संकल्पना<br>१.२ कालखंड : संकल्पना ( प्राचीन / अर्वाचीन)<br>१.३ साहित्यनिर्मिती आणि कालखंड यांचा सहसंबंध<br>१.४ वाङ्मयनिर्मितीमागील प्रेरणा व प्रवृत्तींचा कालिक संदर्भ | १ | १५ |
| २ | **अव्वल इंग्रजी कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>२.१ अर्वाचीन कालखंडाची सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन पार्श्वभूमी<br>२. २ मुद्रणकला व ग्रंथव्यवहार<br>२.३ सरकारी पातळीवरील पाठ्यपुस्तके, व्याकरण व कोशनिर्मितीचे प्रयत्न<br>२.४ भाषांतरयुग | १ | १५ |
| ३ | **इ.स.१८१८ ते १८७४ कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>३.१ या कालखंडातील सुधारणाविषयक विचारांची वाटचाल<br>३.२ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय सुधारणा व साहित्य : सहसंबंध<br>३.३ इ.स.१८१८ ते १८७४ या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक ) : वाटचाल<br>३.४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय यासंदर्भातील निरीक्षणे | १ | १५ |
| ४ | **इ.स. १८७४ ते १९२० कालखंडातील साहित्य: प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>४.१ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारांची वाटचाल | १ | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.२ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय सुधारणा व साहित्य : परस्पर प्रभाव<br>४.३ इ.स. १८७४ ते १९२० या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक ) : वाटचाल<br>४. ४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय या संदर्भातील निरीक्षणे | | |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | वाङ्मयेतिहासाच्या स्वरूपाचा विद्यार्थ्यांना परिचय होईल. |
| **CO-2** (Understanding) | अव्वल इंग्रजी कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप यांचे विवेचन करता येईल. |
| **CO-3** (Applying) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्याचे स्वरूप विशद करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती यांचे विश्लेषण करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्यनिर्मितीची कारणमीमांसा करता येईल. |
| **CO-6** (Creating) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती लक्षात येऊन विद्यार्थ्यांना साहित्यनिर्मितीची आणि विश्लेषणाची प्रेरणा मिळेल. |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 551 MJ** | **अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १९२० ते इ.स. २०१०)** | **Credits- 4**<br>**4 (T)** | **Hours- 60**<br>**60 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

सदर अभ्यासपत्रिकेतून इ. स. १९२० ते २०१० या कालखंडातील मराठी साहित्याचे स्वरूप जाणून घेता येईल. तसेच या कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती समजून घेण्यास मदत होईल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१. या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारप्रवाह व साहित्य : सहसंबंध अभ्यासणे.

२. इ.स. १९२० ते इ.स. २०१० या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप अभ्यासणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **इ.स.१९२० ते १९४५ कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>१.१ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारप्रवाह व साहित्य : सहसंबंध (सत्यशोधकीय विचार, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद, कलावाद, जीवनवाद इ.)<br>१.२ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती व साहित्य : परस्परसंबंध<br>१.३ या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक) : स्वरूप व वाटचाल<br>१.४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय या संदर्भातील निरीक्षणे | १ | १५ |
| २ | **इ.स.१९४५ ते १९६० कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>२.१ या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय स्थित्यंतरे व साहित्य : परस्परसंबंध (स्वातंत्र्य, महायुद्ध आदी घटनांचे साहित्यावरील परिणाम)<br>२.२ या कालखंडातील नवसाहित्य व नवसमीक्षा<br>२. ३ या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक) : स्वरूप व वाटचाल<br>२.४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय या संदर्भातील निरीक्षणे | १ | १५ |
| ३. | **इ.स.१९६०ते १९९० कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>३. १ इ.स. १९६० ते १९९० या कालखंडातील शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय स्थित्यंतरे व साहित्य : परस्परसंबंध<br>३.२ साठोत्तरी साहित्यप्रवाह आणि साहित्य चळवळी : सहसंबंध<br>३.३ या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक ) : स्वरूप व वाटचाल<br>३.४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय या संदर्भातील निरीक्षणे | १ | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **इ.स. १९९० ते २०१० कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप**<br>४.१ इ.स.१९९० ते २०१० या कालखंडातील वाङ्मयाची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>४.२ खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरण स्वीकाराचा साहित्यावरील परिणाम<br>४.३ या कालखंडातील साहित्यप्रकार (निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक ) : स्वरूप व वाटचाल<br>४.४ या कालखंडातील साहित्य : प्रेरणा, प्रवृत्ती, विषय व आशय या संदर्भातील निरीक्षणे | १ | १५ |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील वाङ्मयेतिहासाच्या स्वरूपाचा विद्यार्थ्यांना परिचय होईल. |
| **CO-2** (Understanding) | अव्वल इंग्रजी कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती व स्वरूप यांचे विवेचन करता येईल. |
| **CO-3** (Applying) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्याचे स्वरूप विशद करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती यांचे विश्लेषण करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्यनिर्मितीची कारणमीमांसा करता येईल. |
| **CO-6** (Creating) | इ.स.१८१८ ते १९२० या कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती लक्षात येऊन विद्यार्थ्यांना साहित्यनिर्मितीची आणि विश्लेषणाची प्रेरणा मिळेल. |

**संदर्भ ग्रंथ :**


१. महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे
२. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ४, ५, ६ - महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
३. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन कालखंड - डॉ. प्र. न. जोशी
४. महाराष्ट्र जीवन, खंड १ व २ - गं. बा. सरदार
५. प्रदक्षिणा खंड १ व २ (सा. वा. नाशिक ) - कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे
६. अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका - गं. बा. सरदार
७. साहित्य समाज आणि संस्कृती - दिगंबर पाध्ये
८. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास - शं. दा. पेंडसे
९. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार - द. वा. पोतदार
१०.मराठी वाङ्मयाची सद्यस्थिती - संपादक डॉ. विद्यागौरी टिळक, डॉ. द. दि. पुंडे
११.मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी - गो. म. कुलकर्णी
१२.अर्वाचीन मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी - सदा कऱ्हाडे
१३. मराठी कादंबरी आशय आणि आविष्कार - दत्ता घोलप
१४.आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ व २ - डॉ. अ. ना. देशपांडे
१५.मराठी कादंबरी पहिले शतक - कुसुमावती देशपांडे
१६.मराठी कथा उदगम आणि विकास - इंदुमती शेवडे

१७.धार आणि काठ - नरहर कुरुंदकर
१८.मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप - गो. मा. पवार व म. द. हातकणंगलेकर
१९.टीकास्वयंवर - भालचंद्र नेमाडे
२०.मराठी कादंबरीचा इतिहास - चंद्रकांत बांदिवडेकर
२१.कादंबरी आणि मराठी कादंबरी - उषा हस्तक
२२.आधुनिक मराठी कविता - रा. श्री. जोग
२३.कामगार कवितेतील सामाजिक जाणिवा - दिलीप पी. पवार
२४.वाङ्मयेतिहासाची संकल्पना - द. दि. पुंडे
२५.मराठी नाटक आणि रंगभूमी - वि. भा. देशपांडे
२६.मराठी रंगभूमीच्या तीस रात्री, खंड १, २ व ३ - मकरंद साठे
२७.मराठी कथा रूप आणि परिसर - म. द. हातकणगलेकर
२८.एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र - य. दि. फडके
२९.विसाव्या शतकातील महाराष्ट्र - य. दि. फडके
३०.आधुनिक मराठी काव्य : उद्गम, विकास आणि भवितव्य - दि. के. बेडेकर
३१.मराठी कविता एक दृष्टिक्षेप - नागनाथ कोत्तापल्ले
३२.मराठी कविता १९४५ ते १९६० - रा. श्री. जोग
३३.मराठी कादंबरी : प्रेरणा व स्वरूप – कुसुमावती देशपांडे
३४.खडक आणि पाणी - गंगाधर गाडगीळ
३५.मराठी प्रादेशिक कादंबरी - मदन कुलकर्णी
३६.महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, खंड एक (१८०१ ते १९००) - रमेश नारायण वरखेडे
३७.कादंबरी : स्वरूप व समीक्षा - द. भि. कुलकर्णी
३८.राजवाडे लेखसंग्रह - संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
३९.निवडक मराठी समीक्षा - संपादक गो. मा. पवार
४०.मराठी गद्याचे पूर्वरंग - संपादक भीमराव कुलकर्णी
४१.सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास - श्रीराम गुंदेकर
४२.विचारकिरण - उमेश बगाडे
४३.कादंबरी एक साहित्यप्रकार - हरिश्चंद्र थोरात
४४.मराठी कादंबरी : त्रेसष्ट ते तेरा - हरिश्चंद्र थोरात
४५.मराठीतील चरित्रात्मक कादंबरी - शिरीष लांडगे
४६.कवितेचा अंत:स्वर - देवानंद सोनटक्के
४७.महाराष्ट्रातील विस्थापित आणि मराठी कादंबरी - संजय नगरकर

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 502 MJ** | **ऐतिहासिक भाषाविज्ञान** | **Credits- 4<br>4 (T)** | **Hours- 60<br>60 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून भाषेचे स्वरूप ,संकल्पना , मराठी भाषेचा इतिहास, कुलवृतांत, पूर्वपीठिका, कालिक भेद , भाषेचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आकलन व ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत होईल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप समजावून घेणे.
२) ऐतिहासिक भाषाविज्ञानातील विविध सिद्धांत, संकल्पांचा परिचय करून घेणे .
३) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची व्याप्ती समजावून घेणे.
४) भाषाव्यवहाराची विविधता समजून घेता येईल.
५) मराठीच्या विविध बोलींचा ऐतिहासिक, भाषावैज्ञानिक दृष्टीने विचार करता येईल.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | भाषेचे स्वरूप, कार्ये व अभ्यासपद्धती<br>१.१ भाषेचे स्वरूप व कार्ये<br>१.२ भाषाभ्यासाची आवश्यकता<br>१.३ भाषाभ्यासाची अंगे व पद्धती<br>१.४ ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धती : स्वरूप व संकल्पना<br>१.५ ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धती : महत्त्व व मर्यादा | १ | १५ |
| २ | भाषाकुल संकल्पना व स्वरूप<br>२.१ भाषांचे पुनर्रचन व वर्गीकरण<br>२.२ भाषाकुल संकल्पना<br>२.३ जागतिक भाषाकुले<br>२.४ इंडो युरोपियन भाषाकुल<br>२.५ आर्य भारतीय भाषाकुल आणि मराठी भाषा | १ | १५ |
| ३ | भाषा उद्गम व विकास<br>३.१ भाषा उत्पत्तीविषयक विविध उपपत्ती<br>३.२ मराठीची पूर्वपीठिका – मराठी भाषेचा उगम<br>३.३ मराठीचा निर्मितीकाल (कोरीव लेख आणि ग्रांथिक पुरावे)<br>३.४ अंतर – बहिर – वर्तुळ सिद्धांत<br>२.५ मराठी भाषा विकासाचे कालिक टप्पे (आदिकाल, मध्यकाल आणि अर्वाचीन काल) | २ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करता येईल. |
| **CO-2** (Understanding) | ऐतिहासिक भाषाविज्ञानातील सिद्धांत, महत्त्व व मर्यादा विशद करता येतील. |
| **CO-3** (Applying) | ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या ज्ञानातून स्थानिक भाषांचा अभ्यास करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | जागतिक व भारतीय भाषांचे अध्ययनाच्या दृष्टीकोनातून वर्गीकरण करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | जागतिक व भारतीय भाषांचा तौलनिक अभ्यास करता येईल. |
| **CO-6** (Creating) | विविध भारतीय भाषा व बोलीभाषांवर आधारित प्रकल्प तयार करता येतील. |

**संदर्भ ग्रंथ :**


१. ध्वनिविचार : डॉ. ना.गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह
२. भाषा आणि संस्कृती : डॉ. ना.गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह
३. भाषा आणि भाषाशास्त्र : डॉ.श्री.न.गजेंद्रगडकर, व्हीनस प्रकाशन
४. मराठीचा भाषिक अभ्यास : संपादक- डॉ. मु. श्री. कानडे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
५. वर्णनात्मक आणि ऐतिहासिक : संपादक मालशे, डॉ. इनामदार, डॉ.सोमण, पद्मगंधा प्रकाशन पुणे
६. अर्वाचीन मराठी : डॉ.रमेश धोंगडे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन
७. अभिनव भाषाविज्ञान : डॉ.गं. ना.जोगळेकर, सुविचार प्रकाशन मंडळ
८. भाषाविज्ञान परिचय : डॉ.मालशे, डॉ.पुंडे, डॉ.सोमण, पद्मगंधा प्रकाशन पुणे
९. वैखरीः भाषा आणि भाषाव्यवहार : डॉ. अशोक रा.केळकर, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
१०. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्तन आणि उपयोजन डॉ. मिलिंद मालशे, लोकवाङ्मय प्रकाशन
११. आत्मलक्षी समीक्षा : डॉ. रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे
१२. ऐतिहासिक भाषाशास्त्र : डॉ. र. रा.गोसावी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
१३. सुबोध भाषाशास्त्र : डॉ. प्र.न.जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
१४. सुलभ भाषाविज्ञान : डॉ. दत्तात्रय पुंडे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
१५. यादवकालीन मराठी भाषा : डॉ. श.गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन
१६. आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी व सामान्य) डॉ. कल्याण काळे, डॉ. सोमण, प्रतिमा प्रकाशन
१७. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. महेंद्र कदम, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
१८. बोलू कौतुके : डॉ.एकनाथ पगार, साकेत प्रकाशन औरंगाबाद
१९. शैलीमीमांसा सिद्धांत आणि उपयोजन : डॉ. दिलीप धोंडगे, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर
२०. The Course in General Linguistics F. Sassure
२१. Sociolinguistics Patterns William Labov
२२. Language in Sociocultural Change J.A. Fishman
२३. Sociolinguistics : Selected Reddings Edited By J.B.Pride &amp ; J.Homes

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 552 MJ** | **समाजभाषाविज्ञान** | **Credits- 4<br>4 (T)** | **Hours- 60<br>60 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून मराठी समाजभाषाविज्ञानातील सिध्दांत ,समाज , संस्कृती , व भाषा ज्ञान प्राप्त होईल. बोलीभाषेचे आकलन, संरचना यांचे ज्ञान मिळेल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप समजावून घेणे.
२) समाज , भाषा व संस्कृती या मधील परस्पर संबंध जाणून घेणे.
३) भाषाव्यवहाराची विविधता जाणून घेणे.
४) बोलींची संरचना अभ्यासणे.
५) भाषा संपर्काचे स्वरूप अभ्यासणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **समाजभाषाविज्ञान स्वरूप आणि व्याप्ती**<br>१.१. समाजभाषाविज्ञान : संकल्पना व स्वरूप<br>२.२. समाजभाषाविज्ञान : व्याप्ती व विशेष<br>२.३. भाषेचा समाजसापेक्ष अभ्यास<br>२.४. समाजभाषाविज्ञान अभ्यासशाखेचा उदय व पायाभूत संकल्पना<br>२.५. भाषा, बोली आणि समाज यांचा परस्पर संबंध | १ | १५ |
| २ | **भाषा उपयोजानातील वैविध्य : स्वरूप व मागोवा**<br>२.१ समाजातील भाषा उपयोजनातील वैविध्यता<br>२.२ भाषा आणि सामाजिक संस्था : परस्परसंबंध<br>२.३ भाषा आणि विविध व्यवसायक्षेत्रे : परस्परसंबंध<br>२.४ भाषा आणि आर्थिक वर्ग व्यवस्था : परस्परसंबंध<br>२.५ भाषा, भाषिक भांडार आणि लघुक्षेत्रे : विशिष्ट भाषारूपे | १ | १५ |
| ३ | **भाषा आणि संकृती : परस्परसंबंध**<br>३.१ भाषेचे संकृती सापेक्षत्व : स्वरूप आणि चर्चा<br>३.२ भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था , सांस्कृतिक परंपरा<br>३.३ विविध सामाजिक स्तर आणि भाषा सहसंबंध<br>३.४ भाषेचा लिंग व वय सापेक्ष विचार- स्त्रियांची भाषा, पुरुषाची भाषा, लहान मुलांची भाषा, युवकांची भाषा, वृद्धांची भाषा | २ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करता येईल. |
| **CO-2** (Understanding) | समाजभाषाविज्ञानाची व्याप्ती, स्वरूप, सिद्धांत, महत्त्व व मर्यादा विशद करता येतील. |
| **CO-3** (Applying) | समाजभाषाविज्ञानाच्या ज्ञानातून स्थानिक भाषांचा अभ्यास करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | भारतीय भाषांचे समाजभाषाविज्ञानाच्या अध्ययनाच्या दृष्टीकोनातून वर्गीकरण करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | स्त्रिया, पुरुष, मुले, युवक व वृद्धांच्या भाषेचे मूल्यमापन करता येईल. |
| **CO-6** (Creating) | विविध भारतीय भाषा व बोलीभाषांवर आधारित प्रकल्प तयार करता येतील. |

**संदर्भग्रंथ :**


१. भाषा आणि संस्कृती - ना. गो. कालेकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६२.
२. भाषा : इतिहास आणि भूगोल- कालेकर, ना. गो., मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६४.
३. मराठी शब्दसमीक्षा - मु. श्री. कानडे, सन पब्लिकेशन, पुणे, १९८९.
४. निवडक भाषा आणि जीवन- कल्याण काळे आणि मृणालिनी शहा, (संपा.) मेहता पब्लिकेशन, पुणे, १९९८.
५. मराठी भाषेचा आर्थिक संसार - अशोक केळकर, मराठवाडा साहित्यपरिषद, औरंगाबाद, १९७०.
६. मध्यमा : भाषा आणि भाषाव्यवहार- अशोक केळकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९९६.
७. वैखरी : भाषा आणि भाषाव्यवहार- अशोक केळकर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९३८.
८. मराठी भाषेचे मूळ- विश्वनाथ खैरे, संमत प्रकाशन, पुणे, १९७९.
९. द्रविड महाराष्ट्र- विश्वनाथ खैरे, साधना प्रकाशन, पुणे, १९७६.
१०. भाषाव्यवहार व भाषाशिक्षण- सुरेन्द्र ग्रामोपाध्ये, (संपा.) कासेगाव एज्युकेशन सोसायटी, कासेगाव, २००६.
११. अभिनव भाषाविज्ञान- गं. ना. जोगळेकर, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८७.
१२. मराठी भाषेचा इतिहास - गं. ना. जोगळेकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००५.
१३. सामाजिक भाषाविज्ञान- प्रभाकर जोशी, आणि चारुता गोखले, (संपा.), निराली प्रकाशन, - पुणे, १९९९.
१४. सामाजिक भाषाविज्ञान- रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००६. -
१५. साहित्याची भाषा - भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८९.
१६. सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास- जयश्री पाटणकर, संदर्भ प्रकाशन, नाशिक, २००५.
१७. ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली- अ. का. प्रियोळकर, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६६.
१८. भयंकर सुंदर मराठी भाषा - द. दि. पुंडे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००४.
१९. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन - मिलिंद मालशे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९८.
२०. भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक मालशे - इनामदार - सोमण (संपा.), संजय - प्रकाशन, पुणे, १९८२.
२१. वृद्धी भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन- दिनेश द. माहुलकर, राज्य मराठी विकास - संस्था, मुंबई - २०००.
२२. समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी- नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.
२३. भाषाविवेक- मंगेश विठ्ठल राज्याध्यक्ष, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९७.
२४. भाषा स्वरूप, सामर्थ्य व सौंदर्य- वामन केशव लेले, राजहंस प्रकाशन, २००५. -
२५. समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना- रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००३. -

२६. संज्ञापनविद्या आणि ललितकला- रमेश नारायण वरखेडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त - विद्यापीठ, नाशिक, २००३.
२७. आदिवासी लोककथा : संकल्पना आणि स्वरुप- दीपककुमार वळवी, स्वच्छंद प्रकाशन, - कोल्हापूर, २०१५.
२८. नागपुरी बोली भाषाशास्त्रीय अभ्यास- वसंत कृष्णा वऱ्हाडपांडे, इंदिरा प्रकाशन, नागपूर, १९७२.
२९. समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना- सर्जेराव साळुंखे, मेहता पब्लिकेशन, पुणे, १९९६. -
३०. Sociolinguistics, Cambridge Hudson R. H. Cambridge University Press, 1980.
३१. Novelists on the Novel by Mirian llott Clara Reeve Rutledge and Kegan Paul - London, 1975.
३२. The Influence of English on Marathi- Bhalchandra Nemade (Republished) Popular Prakashan Pvt. Ltd.
३३. समाज भाषा विज्ञान की भूमिक- तेजपाल चौधरी, पंचशील प्रकाशन, जयपूर, १९९५.
३४. भाषा-विज्ञान- भोलानाथ तिवारी, किताब महल, इलाहाबाद, १९७५.
३५. सामाजिक भाषाविज्ञान- कविता रस्तगी, सुलभ प्रकाशन, लखनऊ, २०००.
३६. भाषा आणि जीवन- प्र. ना. परांजपे, (संपा.) महाराष्ट्र अभ्यास परिषद (नियतकालिक), पुणे.
३७. सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली- डॉ. शशिकला कांबळे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, जाने. २०२०
३८. लोकसाहित्य :कला आणि संस्कृती- डॉ. द.के.गंधारे,शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर,२०१३

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 503 MJ** | **प्रशासनिक लेखनकौशल्ये** | **Credits- 2<br>2 (T)** | **Hours- 30<br>30 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

सदर अभ्यासपत्रिकेतून विद्यार्थ्यांना लेखनासंदर्भात ज्ञान प्राप्त होईल. कार्यालयीन लेखनकौशल्ये प्राप्त केल्यामुळे कार्यालयीन लेखन करण्याचे कौशल्य प्राप्त होईल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) कार्यालयीन लेखन करण्याची भाषिक कौशल्ये विकसित करणे.
२) कार्यालयीन भाषेचा परिचय करून देणे.
३) तात्त्विक घटक व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कार्यालयीन लेखन करण्याचे तंत्र विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे.
४) कार्यालयीन लेखन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणविशेषांचा परिचय करून देणे.
५) कार्यालयीन लेखन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची ओळख करून देणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **अ) अर्ज लेखन :**<br>अर्ज संकल्पना, अर्जाचे स्वरूप व अर्जाचे प्रकार : ( विनंती अर्ज, रजेचा अर्ज, परवानगी अर्ज, ना-हरकत प्रमाणपत्र अर्ज, नोकरीसाठीचा अर्ज, तक्रार अर्ज, सवलत अर्ज इतर)<br>**ब) कार्यालयीन पत्रव्यवहार :**<br>पत्रलेखनाचे स्वरूप व पत्रलेखनाचे प्रकार : (कौटुंबिक पत्रलेखन, कार्यालयीन पत्रव्यवहार)<br>कार्यालयीन पत्रांचे प्रकार : (चौकशी पत्र, मागणी पत्र, आदेश पत्र, तक्रार पत्र)<br>**क) कार्यालयीन टिप्पणी लेखन :**<br>टिप्पणी लेखनाची संकल्पना, स्वरूप व प्रकार : (नित्याच्या स्वरूपाची टिप्पणी, माहितीपर टिप्पणी, कार्यवाही टिप्पणी, कार्यालयीन टिप्पणी, पूरक टिप्पणी इ.)<br>**ड) इतिवृत्त लेखन :**<br>इतिवृत्त संकल्पना, स्वरूप व प्रकार : (अहवालात्मक इतिवृत्त, वृत्तांन्तात्मक इतिवृत्त)<br>**इ) प्रशासनिक परिभाषा** | १ | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **अ) घोषणापत्र/जाहीर निवेदन :**<br>घोषणापत्रकाचे स्वरूप व महत्त्व<br>**ब) माहितीपत्रक :**<br>माहितीपत्रक संकल्पना, महत्त्व व वर्गीकरण - (शैक्षणिक संस्था, आर्थिक नियोजनांसाठीच्या योजना, गृहोपयोगी वस्तू, सांस्कृतिक संस्थांची माहिती पत्रके, साहित्य संस्था इ.)<br>**क) निविदा लेखन :**<br>निविदा लेखन संकल्पना, स्वरूप व प्रकार : (एकेरी निविदा, मर्यादित निविदा, खुली निविदा, आंतरराष्ट्रीय निविदा इ.)<br>**ड) अहवाल लेखन :**<br>अहवाल लेखनाचे स्वरूप व प्रकार : (समिती अहवाल, कंपनीचा वार्षिक अहवाल, प्रगती अहवाल, चौकशी अहवाल इ.) | १ | १५ |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | कार्यालयीन लेखनासंदर्भातील ज्ञान विकसित होईल. |
| **CO-2** (Understanding) | कार्यालयीन लेखन पद्धतीची कौशल्ये विकसित होतील. |
| **CO-3** (Applying) | दैनंदिन जीवन आणि रोजगार यासाठी सदर कौशल्यांचे उपयोजन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्ये विकसित होतील. |
| **CO-5** (Evaluating) | विद्यार्थांना कार्यालयीन लेखन कौशल्यांची ओळख होईल. |
| **CO-6** (Creating) | विद्यार्थ्यांना प्रमाणभाषा आणि कार्यालयीन भाषेचे स्वरूप अवगत झाल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 503 MJP** | **प्रशासनिक लेखनकौशल्ये : प्रात्यक्षिक** | **Credits- 2<br>2 (P)** | **Hours- 60<br>60 (P)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

सदर अभ्यासपत्रिकेतून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कार्यालयीन लेखनकौशल्ये प्राप्त केल्यामुळे कार्यालयीन लेखन करण्याचे कौशल्य प्राप्त होईल.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) कार्यालयीन लेखन करण्याची भाषिक कौशल्ये विकसित करणे.
२) कार्यालयीन भाषेचा परिचय करून देणे.
३) तात्त्विक घटक व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कार्यालयीन लेखन करण्याचे तंत्र विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे.
४) कार्यालयीन लेखन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणविशेषांचा परिचय करून देणे.
५) कार्यालयीन लेखन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची ओळख करून देणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **प्रशासनिक लेखनपद्धतींची प्रात्यक्षिके -** प्रकल्प लेखन करणे.<br>अर्ज, पत्र, टिपण्णी, इतिवृत्त, घोषणापत्र, जाहीर निवेदन, माहितीपत्रक, निविदा, अहवाल लेखन इ. | २ | ६० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | कार्यालयीन लेखनासंदर्भातील ज्ञान विकसित होईल. |
| **CO-2** (Understanding) | कार्यालयीन लेखन पद्धतीची कौशल्ये विकसित होतील. |
| **CO-3** (Applying) | दैनंदिन जीवन आणि रोजगार यासाठी सदर कौशल्यांचे उपयोजन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्ये विकसित होतील. |
| **CO-5** (Evaluating) | विद्यार्थांना कार्यालयीन लेखन कौशल्यांची ओळख होईल. |
| **CO-6** (Creating) | विद्यार्थ्यांना प्रमाणभाषा आणि कार्यालयीन भाषेचे स्वरूप अवगत झाल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 553 MJ** | **प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये** | **Credits- 2<br>2 (T)** | **Hours- 30<br>30 (T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून रोजगाराभिमुख मराठीचे स्वरूप स्पष्ट होईल. मराठी भाषेच्या परिक्षेत्रात विस्तारलेल्या प्रसारमाध्यमांसाठी लेखन करण्यासंदर्भातील संधींचा परिचय होऊन त्यासाठी लागणारी लेखनकौशल्ये विद्यार्थी आत्मसात करतील.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) जीवनव्यवहारात होणारे बदल आणि आधुनिकता यांमुळे विस्तारलेल्या व्यावसायिक संधींचा परिचय देणे .
२) प्रसारमाध्यमांसाठी आवश्यक असलेली भाषिक लेखनकौशल्ये विकसित करणे.
३) प्रसारमाध्यमांसाठी लेखन करताना मराठीत रुळलेल्या नव्या परिभाषेचे आकलन करून देणे.
४) प्रसारमाध्यमांसाठी आत्मविश्वासाने मराठीचा वापर करू शकणारा प्रशिक्षित विद्यार्थीवर्ग तयार करणे .
५) मराठी विषयाद्वारे प्रसारमाध्यम विविध व्यावसायिक संधींचा शोध घेण्याची मानसिकता विकसित करणे.

**अभ्यासक्रम:**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये :**<br>अ) मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये : स्वरूप, भाषा वैशिष्ट्ये व लेखनतंत्र<br>वृत्तलेखन, स्तंभलेखन, अग्रलेखन, मुलाखत लेखन व पुरवणीसाठी लेखन<br>ब) दृकश्राव्यमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये : स्वरूप, भाषा, वैशिष्ट्ये व लेखनतंत्र :<br>१. आकाशवाणी : भाषण, चर्चा, मुलाखत, बातमी, रूपक, श्रुतिका, नभोनाट्य, परिसंवाद, उद्घोषणा<br>२. दूरचित्रवाणी : वृत्तलेखन, मुलाखत, चर्चा इ. माहितीप्रधान कार्यक्रम व मालिका, प्रश्नमंजुषा, चर्चात्मक इ. मनोरंजनात्मक कार्यक्रम<br>क) नवसमाजमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये : स्वरूप, भाषा वैशिष्ट्ये व लेखनतंत्र :<br>१. फेसबुक, ब्लॉग, ट्विटर, व्हॉटसअप, वेबसाइट इ. वरील समीक्षात्मक व प्रतिक्रियात्मक लेखन<br>२. युट्यूब व्हिडिओ, स्काईप, फेसबुक, वेबसिरीज, चाट जीपीटीसाठी लेखन | २ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्यांचा परिचय होईल. |
| **CO-2** (Understanding) | मराठीचे प्रसारमाध्यमांसाठी लेखन या क्षेत्रातील उपयोजन ज्ञात होईल. |
| **CO-3** (Applying) | विविध माध्यमांसाठी उपयुक्त लेखनतंत्र अवगत होईल व त्याचे उपयोजन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | विविध माध्यमांतील आकृतिबंधांचे स्वरूप अवगत होईल. |
| **CO-5** (Evaluating) | विद्यार्थांना प्रसारमाध्यमांसाठी लेखन या क्षेत्राचा परिचय होईल. |
| **CO-6** (Creating) | विद्यार्थी प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये आत्मसात करतील. |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 553 MJP** | **प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये : प्रात्यक्षिक** | **Credits- 2**<br>**2 (P)** | **Hours- 60**<br>**60 (P)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून रोजगाराभिमुख मराठीचे स्वरूप स्पष्ट होईल. मराठी भाषेच्या परिक्षेत्रात विस्तारलेल्या प्रसारमाध्यमांसाठी लेखन करण्यासंदर्भातील संधींचा परिचय होऊन त्यासाठी लागणारी लेखनकौशल्ये प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थी आत्मसात करतील.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) जीवनव्यवहारात होणारे बदल आणि आधुनिकता यांमुळे विस्तारलेल्या व्यावसायिक संधींचा परिचय देणे .
२) प्रसारमाध्यमांसाठी आवश्यक असलेली भाषिक लेखनकौशल्ये विकसित करणे.
३) प्रसारमाध्यमांसाठी लेखन करताना मराठीत रुळलेल्या नव्या परिभाषेचे आकलन करून देणे.
४) प्रसारमाध्यमांसाठी आत्मविश्वासाने मराठीचा वापर करू शकणारा प्रशिक्षित विद्यार्थीवर्ग तयार करणे .
५) मराठी विषयाद्वारे प्रसारमाध्यम विविध व्यावसायिक संधींचा शोध घेण्याची मानसिकता विकसित करणे.

**अभ्यासक्रम:**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्यांची प्रात्यक्षिके**<br>अ) मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये : स्वरूप, भाषा वैशिष्ट्ये व लेखनतंत्र<br>वृत्तलेखन, स्तंभलेखन, अग्रलेखन, मुलाखत लेखन व पुरवणीसाठी लेखन<br>ब) दृकश्राव्यमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये : स्वरूप, भाषा, वैशिष्ट्ये व लेखनतंत्र :<br>१. आकाशवाणी : भाषण, चर्चा, मुलाखत, बातमी, रूपक, श्रुतिका, नभोनाट्य, परिसंवाद, उद्घोषणा<br>२. दूरचित्रवाणी : वृत्तलेखन, मुलाखत, चर्चा इ. माहितीप्रधान कार्यक्रम व मालिका, प्रश्नमंजुषा, चर्चात्मक इ. मनोरंजनात्मक कार्यक्रम<br>क) नवसमाजमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये : स्वरूप, भाषा वैशिष्ट्ये व लेखनतंत्र :<br>१. फेसबुक, ब्लॉग, ट्विटर, व्हॉटसअप, वेबसाइट इ. वरील समीक्षात्मक व प्रतिक्रियात्मक लेखन<br>२. युट्यूब व्हिडिओ, स्काईप, फेसबुक, वेबसिरीज, चाट जीपीटीसाठी लेखन | २ | ६० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्यांची माहिती होईल. |
| **CO-2** (Understanding) | मराठीचे प्रसारमाध्यमांसाठी लेखन या क्षेत्रातील उपयोजन ज्ञात होईल. |
| **CO-3** (Applying) | विविध माध्यमांसाठी उपयुक्त लेखनतंत्र अवगत होईल व त्याचे उपयोजन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | विविध माध्यमांतील आकृतिबंधांचे स्वरूप अवगत होईल. |
| **CO-5** (Evaluating) | विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमांसाठी लेखन या क्षेत्राचा परिचय होईल. |
| **CO-6** (Creating) | विद्यार्थी प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये आत्मसात करतील. |

**संदर्भ साधने :**


१. व्यावहारिक मराठी, काळे कल्याण व पुंडे दत्तात्रय, निराली प्रकाशन, पुणे
२. व्यावहारिक मराठी, नसीराबादकर ल. रा., फडके प्रकाशन, कोल्हापूर
३. मराठी लेखन मार्गदर्शिका- राज्य मराठी विकास संस्था, यास्मिन शेख
४. व्यावहारिक मराठी, गोविलकर लीला, पाटणकर जयश्री, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
५. उपयोजित मराठी डॉ. ग. ना. जोगळेकर कृतज्ञता ग्रंथ, मोडक केतकी, शेणई संतोष, शेणई सुजाता, संपा., पद्मगंधा प्रकाशन, पुणे
६. भाषिक सर्जन आणि उपयोजन, गवस राजन, शिंदे अरुण, पाटील गोमटेश्वर, दर्या प्रकाशन, पुणे
७. संपादन आणि लेखन कौशल्ये, भोर उज्ज्वला, प्रकाशन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
८. उपयोजित मराठी, माळी संदीप, अक्षरवेध प्रकाशन, पुणे
९. प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा, शेळके भास्कर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
१०. व्यावहारिक व उपयोजित मराठी भाग-३, थिगळे वेदश्री, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
११. उपयोजित मराठी, लांडगे संजय, दिलीपराज प्रकाशन, पुणे
१२. व्यावहारिक मराठी भाग-3, तावरे स्नेहल, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
१३. व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये, जोशी नीला, दर्या प्रकाशन, पुणे
१४. मराठी शुद्धलेखन प्रदीप, मो. रा. वाळंबे, संपा. अरूण फडके, पुणे
१५. प्रशासनिक मराठी भाषेचा विकास, गीता भागवत, राज्य मराठी विकास संस्था, प्रशासन, मुंबई
१६. भाषांतर मीमांसा ,डॉ. अंजली सोमण,डॉ. कल्याण काळे
१७. कार्यालयीन कौशल्ये (उपयोजित मराठी) - डॉ. अक्षय घोरपडे, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
१८. अनुवाद मीमांसा, संपा. केशव तुपे, साक्षात, औरंगाबाद
१९. प्रसार माध्यमांसाठी लेखनकौशल्ये, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
२०. संपादन: स्वरूप व कौशल्ये, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.
२१. मराठी लेखन कोश, अरूण फडके, ढवळे प्रकाशन, मुंबई.
२२. माध्यमांसाठी लेखन व संवाद कौशल्ये – डॉ. अक्षय घोरपडे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
२३. प्रसारमाध्यमे आणि मराठी - डॉ. उज्ज्वला भोर, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२०

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 504 MJP** | **प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया** | **Credits- 2 2(P)** | **Hours- 60 60(P)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून प्रकाशन संस्था, छापखाने, ग्रंथ वितरण संस्था, ग्रंथ विक्री दुकाने इत्यादी स्थळांना भेटी देणे तसेच प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त होतील.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण घेणे.

२) प्रकाशन संस्था, छापखाने, ग्रंथ वितरण संस्था, ग्रंथ विक्री दुकाने इत्यादी स्थळांना भेटी देऊन प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कौशल्ये प्राप्त करणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **प्रकाशनव्यवहार**<br>प्रकाशन संस्थांना भेटी देऊन प्रकाशन व्यवहाराचा कार्यानुभव घेणे,<br>अ) प्रकाशन संस्था : स्वरूप, कार्यप्रणाली, कॉपीराईट कायदा व ठळक तरतुदी इ.<br>ब) संपादन व्यवहार : स्वरूप, प्रक्रिया ,संपादकीय संस्कार<br>क) मुद्रित शोधन : लेखनविषयक नियम, मुद्रितशोधन खुणा, विरामचिन्हे, अवतरणे<br>ड) ग्रंथविक्री, वितरण, वाचकसंवाद इत्यादी | १ | ३० |
| २ | **ग्रंथनिर्मितीप्रक्रिया**<br>ग्रंथनिर्मितीप्रक्रियेतील घटक व कार्ये प्रात्यक्षिकाद्वारे समजून घेणे,<br>लेखक संवाद, संहिता संपादन, संपादकीय संस्कार, मुद्रणप्रत, मुखपृष्ठ, छपाई, ग्रंथ बांधणी इत्यादी | १ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित होतील.

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया यांचे स्वरूप सांगता येतील. |
| **CO-2** (Understanding) | प्रकाशनव्यवहारासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त होतील. |
| **CO-3** (Applying) | ग्रंथनिर्मिती, ग्रंथाचे संपादन आणि प्रकाशन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रिया यासाठी आवश्यक कौशल्यांची चर्चा करून त्यांचा अंगीकार करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | प्रकाशनव्यवहार आणि ग्रंथनिर्मितीप्रक्रियेच्या कौशल्यांचा परिस्थितीनुरूप वापर करता येईल. |
| **CO-6** (Creating) | ग्रंथनिर्मिती प्रक्रियेत नाविन्यपूर्णता आणता येईल. |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Core** | | | |
| **MAR 554 MJP** | **नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन** | **Credits- 2<br>2(P)** | **Hours- 60<br>60(P)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून प्रकाशन संस्था, छापखाने, वितरण संस्था, इत्यादी स्थळांना भेटी देणे तसेच प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त होतील.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१) नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण घेणे.

२) प्रकाशन संस्था, छापखाने, वितरण संस्था, इत्यादी स्थळांना भेटी देऊन प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन कौशल्ये प्राप्त करणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १ | **नियतकालिक संपादनाचा क्षेत्रीयभेटीद्वारा कार्यानुभव घेणे**<br>प्रकाशक, संपादक व व्यवस्थापक यांची मुलाखत घेऊन नियतकालिक संपादनाचा व्यवहार समजून घेणे<br>(नियतकालिकाची संकल्पना आणि स्वरूप, संपादन हेतू, प्रेरणा, विविधता, संपादनापूर्वीची पथ्ये, संपादकाची कार्ये आणि भूमिका, अपेक्षित वाचकवर्गाचा विचार, संहिता संपादनपद्धती, विषयविवेचन, नियतकालिकांची मुखपृष्ठे, मलपृष्ठ, आधुनिक तंत्रज्ञान या अनुषंगाने कलावंत व तंत्रज्ञांद्वारा संवाद व कार्यानुभव, इत्यादी) | १ | ३० |
| २ | **नमुना नियतकालिक, दिवाळी अंक, गौरवग्रंथ, स्मरणिका तयार करणे**<br>ललित साहित्याचे संपादन - कथनात्म साहित्य, कविता, नाटक आणि ललितलेखन<br>ललितेतर साहित्याचे संपादन - वैचारिक साहित्य, माहितीपर गौरवग्रंथ, स्मरणिका<br>(भाषिक संपादन, शीर्षक, उपशीर्षके, परिच्छेद, अंतिम मुद्रणप्रत, अक्षररेखांकन, मुखपृष्ठ रेखांकन, मांडणी, आराखडा, रेखाचित्रे इत्यादी) | १ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs)**

या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित होतील.

| | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | नियतकालिकांचे स्वरूप आणि संपादन यांची माहिती सांगता येतील. |
| **CO-2** (Understanding) | नियतकालिकांच्या संपादनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त होतील. |
| **CO-3** (Applying) | नियतकालिकांचे संपादन करता येईल. |
| **CO-4** (Analysing) | नियतकालिकांच्या संपादनासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची चर्चा करून त्यांचा अंगीकार करता येईल. |
| **CO-5** (Evaluating) | नियतकालिकांच्या संपादनप्रक्रियेच्या कौशल्यांचा परिस्थितीनुरूप वापर करता येईल. |
| **CO-6** (Creating) | नियतकालिकांच्या संपादनप्रक्रियेत नाविन्यपूर्णता आणता येईल. |

**संदर्भ ग्रंथ :**


१. वाड्मयीन नियतकालिके - डॉ. स्वाती कर्वे, मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड -७ वा, १८५० ते २००० भाग दुसरा, मसाप पुणे, प्र.आ. २०१०
२. महात्मा फुले समग्र वाङ्मय- (संपा) धनंजय कीर, डॉ. स. गं. मालशे, य. दि. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, ६ वी आवृत्ती, नोव्हेंबर २००६
३. मराठी नियतकालिकांचा वाडमयीन अभ्यास - व. दि. कुलकर्णी, मुंबई विद्यापीठ मराठी विभाग आणि श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९८७,
४. संक्षिप्त मराठी वाड्मयकोश १९२० ते २००३ - (संपा.) प्रभा गणोरकर, प्र. आ. फेब्रुवारी २००४
५. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास - प्र. न. जोशी, प्रसाद प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७९,
६. आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास भाग १ - अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन पुणे, २ री आवृत्ती आक्टोबर १९९९
७. प्रतिष्ठानचे वाङ्मयीन कार्य - डॉ. संगिता मोरे, मैत्री प्रकाशन लातूर, प्रथमावृत्ती २०११.
८. प्रकाशन व्यवसाय परिचय - शरद गोगटे, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ
९. पुस्तक प्रकाशन : तंत्र आणि मंत्र - माधव शिरवळकर, संगणक प्रकाशन
१०. एका प्रकाशकाची प्रकाशयात्रा - संपा. डॉ. केशव सखाराम देशमुख, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
११. प्रकाशकनामा - मधुकाका कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन
१२. अनुष्टुभ नियतकालिकाचे वाङ्मयीन योगदान - डॉ. प्रकाश शेवाळे, हर्मिस प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०२१
१३. सत्यशोधकीय नियतकालिके - अरुण शिंदे, कृष्णा संशोधन व विकास अकादमी
१४. सोबतचे पहिले पान, खंड- १ सत्ता- ग. वा. बेहेरे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
१५. सोबतचे पहिले पान, खंड- २ संघर्ष- ग. वा. बेहेरे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
१६. सोबतचे पहिले पान, खंड- ३ राष्ट्रवाद- ग. वा. बेहेरे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
१७. सोबतचे पहिले पान, खंड- ४ रचना- ग. वा. बेहेरे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
१८. मराठी साहित्याच्या अभिवृद्धीसाठी- विनय हर्डीकर, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
१९. पत्रकारितेतील वास्तव- राजेश राजोरे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२०. प्रकाशन, संपादन आणि लेखनकौशल्ये - डॉ. उज्ज्वला भोर, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२१
२१. प्रकाशन व्यवहार आणि संपादन - डॉ. उज्ज्वला भोर, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२०

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Elective** | | | |
| **MAR 510 MJ** | **साहित्यप्रवाहांचा अभ्यास : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य** | **Credits- 2 2(T)** | **Hours- 30 30(T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचा परिचय करून घेणे आणि त्याद्वारे पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन आणि जीवनविषयक जाणिवा समृध्द करणे. वाङ्मयीन मूल्यांचे आणि जीवनमूल्यांचे संस्कार करणे. या प्रवाहांतील विविध साहित्यप्रकारांतील साहित्यकृतींच्या वाचनातून साहित्यिक अभिरुची वृद्धिंगत करणे.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचे स्वरूप स्पष्ट करणे.
२. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांच्या निर्मितीची कारणे, परंपरा समजावून घेणे.
३. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचे स्वरूप व कार्य यांची चिकित्सा करणे.
४. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचा विकास, योगदान यांचे मूल्यमापन करणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १. | **दलित साहित्य :**<br>१. दलित साहित्यप्रवाहाचा उगम व प्रेरणा<br>२. दलित साहित्याचा विकास व वैशिष्ट्ये<br>३. दलित साहित्याचे स्वरूप | १ | १५ |
| २. | **ग्रामीण साहित्य :**<br>१. ग्रामीण साहित्यप्रवाहाचा उगम व प्रेरणा<br>२. ग्रामीण साहित्याचा विकास व वैशिष्ट्ये<br>३. ग्रामीण साहित्याचे स्वरूप | १ | १५ |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित होतील.

| **दलित साहित्य व ग्रामीण साहित्य** | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांविषयी ज्ञान प्राप्त होईल. |
| **CO-2** (Understanding) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांचा उगम व विकास स्पष्ट होईल. |
| **CO-3** (Applying) | साठोत्तरी आणि त्यापूर्वीच्या साहित्याचा तौलनिक अभ्यासाची क्षमता विकसित होईल. |
| **CO-4** (Analysing) | साहित्यकृतींचे साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांमध्ये वर्गीकरण करण्याची क्षमता विकसित होईल. |
| **CO-5** (Evaluating) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांतील साहित्यकृतींचे मूल्यमापन क्षमता विकसित होईल. |
| **CO-6** (Creating) | या प्रवाहांमध्ये लेखन करण्याचे कौशल्ये व या अनुषंगाने रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याचा दृष्टीने क्षमता विकसित होईल. |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-१) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Elective** | | | |
| **MAR 510 MJP** | **साहित्यप्रवाहांचा अभ्यास : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य - प्रात्यक्षिक** | **Credits- 2 2(P)** | **Hours- 60 60(P)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

या अभ्यासपत्रिकेतून दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचा परिचय करून घेणे आणि त्याद्वारे पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन आणि जीवनविषयक जाणिवा समृध्द करणे. वाङ्मयीन मूल्यांचे आणि जीवनमूल्यांचे संस्कार करणे. या प्रवाहांतील विविध साहित्यप्रकारांतील साहित्यकृतींच्या वाचनातून साहित्यिक अभिरुची वृद्धिंगत करणे. प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विविध कौशल्ये विकसित करणे.

**अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :**

१. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचे स्वरूप व कार्य यांची चिकित्सा करणे.
२. दलित व ग्रामीण साहित्यप्रवाहांचा विकास, योगदान यांचे मूल्यमापन करणे.

**अभ्यासक्रम :**

| घटक | तपशील | श्रेयांक | घड्याळी तास |
|---|---|---|---|
| १. | **प्रात्यक्षिक : दलित साहित्य**<br>मुलाखत<br>क्षेत्रभेट<br>प्रकल्पलेखन इ. | १ | ३० |
| २. | **प्रात्यक्षिक : ग्रामीण साहित्य**<br>मुलाखत<br>क्षेत्रभेट<br>प्रकल्पलेखन इ. | १ | ३० |

**अभ्यासपत्रिकेची अध्ययन निष्पत्ती (COs) :**

या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित होतील.

| दलित साहित्य व ग्रामीण साहित्य | |
|---|---|
| **CO-1** (Remember) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांविषयी ज्ञान प्राप्त होईल. |
| **CO-2** (Understanding) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांचा उगम व विकास स्पष्ट होईल. |
| **CO-3** (Applying) | साठोत्तरी आणि त्यापूर्वीच्या साहित्याचा तौलनिक अभ्यासाची क्षमता विकसित होईल. |
| **CO-4** (Analysing) | साहित्यकृतींचे साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांमध्ये वर्गीकरण करण्याची क्षमता विकसित होईल. |
| **CO-5** (Evaluating) | साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांतील साहित्यकृतींचे मूल्यमापन क्षमता विकसित होईल. |
| **CO-6** (Creating) | या प्रवाहांमध्ये लेखन करण्याचे कौशल्ये व या अनुषंगाने रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याचा दृष्टीने क्षमता विकसित होईल. |

| M.A. मराठी – प्रथम वर्ष (सत्र-२) अभ्यासक्रम [Level 6.0] | | | |
|---|---|---|---|
| **Course Type : Major Elective** | | | |
| **MAR 560 MJ** | **साहित्यप्रवाहांचा अभ्यास : आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य** | **Credits- 2 2(T)** | **Hours- 30 30(T)** |

**अभ्यासपत्रिकेविषयी :**

